Gaurishankar Seva Samiti's

# Vidnyan Mahavidyalaya, Malkapur, Dist. Buldana

**Academic Year: 2022-23**

**Report of Activity**

## Azadi ka Amrut Mahoustav (Har Ghar Tiranga)

1. **Title of the Activity/Event:**

"Har Ghar Tiranga"

2. **Objectives:**

Aims to celebrate Azadi ka Amrut Mahoustav .

**The Context:**

| | | |
|---|---|---|
| Organized by | : | Vidnyan Mahavidyalaya, Malkapur |
| Date | : | 9/08/2022 To 15/08/2022 |
| Venue | : | Vidnyan Mahavidyalaya, Malkapur |

3. **The Activity/Event:**

| | | |
|---|---|---|
| Description | : | All the activities are conducted of this event are given in evidence. |
| List of Students | : | All students |

4. **Problems Encountered and Resources Required**

**Nil**

5. **Evidence of Success: (Achievements/Awards/Certificates)**

Photos/Videos & Newspaper cuttings

देशोन्नती

## अमृत महोत्सवानिमित्त काढण्यात आली रॅली

**मलकापूर** ▪ अमृत महोत्सव निमित्ताने १२ ऑगस्ट रोजी विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्ताने शहरातून विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष राजेश महाजन, सचिव पी.जी. मोहता, उपाध्यक्ष गोविंद बाहेती, रमेश उमाळकर, माजी आमदार वसंतराव शिंदे, प्राचार्य स्वरूप दत्ता, प्राचार्य डॉ.बी.बी.वानखेडे, प्रा.सौ.पी.एम. इंगळे, डिवायएसपी अभिनव त्यागी, ठाणेदार विजयसिंह राजपूत, वीरपत्नी श्रीमती सुषमा संजयसिंह राजपूत आदी उपस्थित होते.

सदर रॅली मलकापूर शहर पोलीस स्टेशनमध्ये जावून त्याठिकाणी पथसंचलन



करून जनजागृती करण्यात आली. त्यानंतर शहीर संजयसिंह राजपूत यांच्या स्मारकावर जावून त्याठिकाणी श्रध्दांजली अर्पण करण्यात आली व राष्ट्रगिताने रॅलीचा समारोप करण्यात आला.(ता.प्र.)

Buldhana Edition
Aug 14, 2022 Page No. 3
Powered by : eReleGo.com

गौरीशंकर सेवा समिती व्दारा संचालित

**विज्ञान महाविद्यालय, मलकापूर.जि. बुलढाणा**

(कायम संलग्नीत सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती)

दिनांक:– २०/०८/२०२२

## अहवाल

''स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव''
उत्सव तिरंगी रंगाचा
आकाशाने आज लपेटून घेतला,
अभिमान आहे या मातीचा
७५ व्या स्वातंत्र्यदिनी गर्व,
बाळगूया भारतीय असल्याचा,

स्वातंत्र्याच्या आणि स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या लाख लाख शुभेच्छा

आपल्या भारत देशाला स्वतंत्र होऊन आज ७५ वर्ष पूर्ण झाले आहेत. आपण सर्व अतिशय उत्साहाने आणि आनंदाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला. आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळूवन देण्यासाठी ज्या महान नेत्यांनी कांतिवीरांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले अशा सर्वांना वंदन करत आहे. मित्रांनो ''भा'' म्हणेज तेज आणि ''रत'' म्हणजे रममाण झालेला तेजात रममाण झालेला देश म्हणजे भारत देश होय. आपल्या भारत देशामध्ये सर्व जाती धर्माचे लोक एकजुटीने राहतात. त्यामुळे आपला देश सर्वधर्मसमभाव असलेला देश म्हणुन ओळखला जातो. आपण खुप भाग्यशाली आहोत कि हा दिवस आपण गौरवाने साजरा करत आहोत आणि ह्याचे पूर्ण श्रेय आपल्या देशासाठी प्राणांची आहुती दिली त्या सर्व वीर जवानांना आहे. विद्यापीठाच्या सूचनेप्रमाणे आमचा महाविद्यालयाचे बॅनर खालीलप्रमाणे होते.




आमच्या महाविद्यालयात स्वातंत्र्याचा अंतर्गत स्वराज्य सप्ताह आराखडयाप्रमाणे साजरा करण्यात आला.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>कार्यक्रमाचे नाव</th><th>प्रभारी प्राध्यापक</th><th>दिनांक</th></tr>
<tr><td>१</td><td>रांगोळी स्पर्धा</td><td>प्रा. सौ जे. एस. कुळकर्णी</td><td>१३/०८/२०२२ ते १५/०८/२०२२</td></tr>
<tr><td>२</td><td>वकृत्व स्पर्धा</td><td>प्रा. डॉ. जी. एस. कु-हाडे</td><td>१३/०८/२०२२ ते १५/०८/२०२२</td></tr>
<tr><td>३</td><td>निबंध स्पर्धा</td><td>प्रा. डॉ. आरी. टी. परिहार</td><td>१२/०८/२०२२</td></tr>
<tr><td>४</td><td>देशभक्तीपर गीत गायन</td><td>प्रा. डॉ. जी. एस. कु-हाडे</td><td>१५/०८/२०२२</td></tr>
<tr><td>५</td><td>घोषवाक्य</td><td rowspan="2">प्रा. सौ. पी. एम. इंगळे,<br>प्रा. आर. एन. पाटील</td><td>०९/०८/२०२२</td></tr>
<tr><td>६</td><td>पथनाटय</td><td rowspan="6">१२/०८/२०२२</td></tr>
<tr><td>७</td><td>लेझीम पथक</td><td>प्रा. व्हि. एस. देवळे</td></tr>
<tr><td>८</td><td>ध्वजसंहिता जनजागृती</td><td rowspan="3">प्रा. सौ. पी. एम. इंगळे,<br>प्रा. आर. एन. पाटील</td></tr>
<tr><td>९</td><td>ध्वजवाटप</td></tr>
<tr><td>१०</td><td>परीसरातील स्वातंत्रसैनिकांची माहिती व कृतज्ञता</td></tr>
<tr><td>११</td><td>प्रभात फेरी</td><td>प्रा. सौ. पी. एम. इंगळे,<br>प्रा. आर. एन. पाटील<br>श्री. यु. व्हि. शिंदे</td></tr>
</table>

दिनांक ९ ऑगस्ट हा ''आगस्ट क्रांती दिन'' म्हणुन महाविद्यालयामध्ये साजरा करण्यात आला हया निमित्त आमच्या महाविद्यालयात ऑनलाईन प्रश्नमंजुषेचे

आयोजन करण्यात आले आणि १५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला जे विद्यार्थी पास झाले त्यांना ऑनलाईन सर्टिफिकेट देण्यात आले.

दिनांक १० ऑगस्ट २०२२ महाविद्यालयामध्ये "हर घर तिरंगा" या उपक्रमाअंतर्गत ज्यांना महाविद्यालयामधुन झेंडा घ्यायचा आहे त्यांची गुगल फॉर्म व्दारे नोंदणी करुन घेतली. त्यामध्ये एकुण १८० विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी फॉर्म भरला. १२ ऑगस्ट रोजी महाविद्यायामध्ये तिरंग्याचे मोफत वाटप करण्यात आले त्यासोबत विद्यार्थ्यांना ध्वजसंहिता वाटप करण्यात आली.

दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी आंतरराष्ट्रीय युवा दिन निमित्त भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले आणि रॅली उत्साहात पार पडली. या प्रसंगी महाविद्यालयामध्ये रॅलीचे उद्‌घाटन भारत मातेचे पुजन करुन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. मोरेशजी महाजन , सचिव डॉ.पी.जी.मोहता , उपाध्यक्ष श्री. गोविंद बाहेती, उपाध्यक्ष रमेश उमाळकर, संचालक श्री. वसंतरावजी शिंदे (माजी आमदार), डॉ. स्वरुप दत्ता (प्राचार्य एम.एस.एम.इंग्लीश स्कुल) व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.बी.वानखडे उपस्थीत होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्र.प्राध्यापक सौ. पी.एम.इंगळे यांनी केले. या प्रसंगी डॉ.पी.जी.मोहता व श्री. रमेश उमाळकर यांनी विद्यार्थ्याना मार्गदर्शन केले. रॅलीला विज्ञान महाविद्यालयापासुन सुरुवात करण्यात आली. रॅलीमध्ये लेझीम पथकाने सर्वांचे लक्ष वेधले होते. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्फुर्त पणे रॅलीमध्ये सहभाग नोंदविला. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत 'हर घर तिरंगा' अभियान तसेच विर शहीद व थोर स्वातंत्र सैनीक यांच्या स्मरणार्थ विविध जयघोषाच्या माध्यमातुन लोकांमध्ये जनजागृती केली. अशा आगळया वेगळया तिरंगा रॅलीचे सर्वत्र शहरातुन कौतुक होत आहे. या प्रसंगी शहर पोलीस स्टेशन मध्ये डी.वाय.एस.पी श्री. त्यागी साहेब व पोलीस निरीक्षक श्री. राजपूत साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन शहीद जवानांच्या स्मरनार्थ काढलेल्या रॅलीचे स्वागत केले. दरम्यान विद्यार्थ्यांनी पथनाटय करीत हर घर तिरंगा बाबत जनजागृती करण्यात आली. या जनजागृतीचा समारोप शहीद संजयसिंह राजपूत यांना पुष्पचक

वाहात भारत माता की जय अशा घोषना देत बासुरीच्या सुरेख  साथीने राष्ट्रगिताने समारोप करण्यात आला. याप्रसंगी शहीद संजयसिंह राजपूत यांच्या पत्नी सुष्माताई राजपूत उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या रासेयो पथकाने प्रा.सौ. पुनम इंगळे व प्रा. रुपेश पाटील व सर्व स्वयंसेवकांनी केले.













NSS Co-ordinator,
Vidnyan Mahavidyalaya,
Malkapur,Dist.Buldana,